SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004
Phone : EPABX –2609000 Seminar – 2609141
Fax : +91-231-2691533, 2693294 & 2692333 Website : www.unishivaji.ac.in
email : pgseminar@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन : इपीबीएक्स – 2609000 सेमीनार 2609141
फॅक्स : +91-231-2691533, 2693294 व 2692333 Website : www.unishivaji.ac.in
email : pgseminar@unishivaji.ac.in
Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

संदर्भ क. :– शिवाजी वि./सेमिनार विभाग/ 00122 दि. 24/08/2022

मा.प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था.

**विषय : शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा सन 2018–2019 व सन 2019–2020 निकाल.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयसंदर्भात आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, सन 2018–2019 व सन 2019–2020 मधील शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेत बिगर व्यावसायिक व व्यावसायिक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील सृजनशीलतेची जोपासना व्हावी, त्यांच्यातील सृजनशीलता अधिकाधिक वृद्धिंगत व्हावी यास्तव महाविद्यालयांमधून प्रतिवर्षी नियतकालिके प्रकाशित केली जातात आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठामार्फत प्रतिवर्षी नियतकालिक स्पर्धा आयोजित केली जाते. या अंकातून वाङ्‌मय निर्मिती करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या आणि महाविद्यालयांकडून उत्तम दर्जाचे नियतकालिक प्रकाशित व्हावे या हेतूने शिवाजी विद्यापीठाची ही योजना इ.स. 1970 पासून सुरु आहे. आता या योजनेचे नामाभिदान **"शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा"** असे आहे.

सन 2018–2019 या स्पर्धेसाठी 73 बिगर व्यावसायिक व 15 व्यावसायिक महाविद्यालयांनी भाग घेतला होता. या नियतकालिकांचे परीक्षण करून खालील महाविद्यालयांना सर्वसाधारण विजेते पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

**महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा सन 2018 –2019 निकाल**

**सर्वसाधारण विजेता पुरस्कार – बिगर व्यावसायिक गट**

| विजेता कमांक | महाविद्यालयाचे नाव | संपादकांचे नाव |
|---|---|---|
| **प्रथम क्रमांक** | यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा. | डॉ. सौ. संयोगिता संजीव वाडीकर. |
| **व्दितीय क्रमांक** | विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर. | प्रा. भाऊ काशिनाथ गोसावी. |
| **तृतीय क्रमांक** | बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा. | प्रा.डॉ. नागेश वाले. |

**व्यावसायिक महाविद्यालये**

| विजेता कमांक | महाविद्यालयाचे नाव | संपादकांचे नाव |
|---|---|---|
| **प्रथम क्रमांक** | तात्यासाहेब कोरे इन्स्टिटयूट ऑफ इंजिनियरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, वारणानगर. | डॉ. बाळासो टी. साळोखे. |
| **व्दितीय क्रमांक** | आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, आष्टा. | श्री. राहूल अ. पाटील. |
| **तृतीय क्रमांक** | डी.के.टी.ई टेक्सटाईल ॲण्ड इंजिनियरिंग इन्स्टिट्यूट, इचलकरंजी. | प्रा. आर डी शिर्के. |

सन 2019–2020 या स्पर्धेसाठी 35 बिगर व्यावसायिक व 10 व्यावसायिक महाविद्यालयांनी भाग घेतला होता. या नियतकालिकांचे परीक्षण करून खालील महाविद्यालयांना सर्वसाधारण विजेते पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

**महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा सन 2019 –2020 निकाल**
**सर्वसाधारण विजेता पुरस्कार – बिगर व्यावसायिक गट**

| विजेता कमांक | महाविद्यालयाचे नाव | संपादकांचे नाव |
|---|---|---|
| **प्रथम क्रमांक –** | विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर. (स्वायत्त) | प्रा. भाऊ काशीनाथ गोसावी |
| **व्दितीय क्रमांक –** | छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा. | प्रा.डॉ.सुभाष वाघमारे |
| **तृतीय क्रमांक –** | मुधोजी महाविद्यालय, फलटण जि. सातारा. | प्रा. लक्ष्मीकांत वेळेकर |

**व्यावसायिक महाविद्यालये**

| विजेता कमांक | महाविद्यालयाचे नाव | संपादकांचे नाव |
|---|---|---|
| **प्रथम क्रमांक –** | डी. के टी ई संस्थेचे टेक्सटाईल ॲण्ड इंजिनियरिंग इन्स्टिटयूट, इचलकरंजी. | प्रा. आर. डी. शिर्के |
| **व्दितीय क्रमांक –** | राजारामबापू इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी साखराळे, इस्लामपूर. | डॉ. श्रीमती मनिषा जगताप |
| **तृतीय क्रमांक –** | डी. वाय पी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, कोल्हापूर. | श्री. एम. जे. पाटील |

तसेच सन 2018–2019 साठी 86 विद्यार्थ्यांना व 133 विद्यार्थिनींना अशी मिळून एकूण 219 तसेच सन 2019–2020 साठी 89 विद्यार्थ्यांना व 141 विद्यार्थिनींना अशी मिळून एकूण 230 वैयक्तिक पारितोषिके प्राप्त झाली आहेत. तसेच नियतकालिक स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या महाविद्यालयातील वैयक्तिक पारितोषिक, पात्र विद्यार्थ्यांची नावे, प्रशस्तीपत्र व धनादेश याबाबतची माहिती स्वतंत्ररित्या आपल्या महाविद्यालयास कळविणेत येतील, याची कृपया नोंद घेणेत यावी. सदर स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमासंबंधी नंतर पत्राव्दारे कळविण्यात येईल.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव